दिनांक 13/02/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. 141

विषय: विटा नगर परिषदेकडून महिला व बालकल्याण विभागासाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या निधीमधून विटा नगरपरिषद हद्दीतील शाळा व कॉलेजमधील किशोरवयीन मुलींना सॅनिटरी पॅडचे वाटप करणेबाबत निर्णय घेणे....

संदर्भ- दि. 13/02/2023 रोजीचे कर निरीक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार,

नगर विकास शासन निर्णय क्रमांक एम यु एम २०२१ प्र.क्र. ३८५ नवि-१७ दिनांक २९ मार्च २०२२ नुसार नगरपरिषदेकडील महिलांसाठी राखीव निधी मधून राबवयाच्या महिला व बालकल्याणाच्या योजना निश्चितीकरण व मार्गदर्शक सूचना निर्गमित केले आहेत. त्यानुसार विटा नगरपरिषदेकडून महिला व बालकल्याण विभागासाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या निधीमधून विटा नगरपरिषद हद्दीतील शाळा व कॉलेजमधील किशोरवयीन मुलींना सॅनिटरी पॅडचे वाटप करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. यासाठी येणाऱ्या व इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे. याकामी आवश्यक त्या निविदा मागविणेत याव्यात व पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
(संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा